
दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २५१ वा मंगळवार दि.०१ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## बँकांमधील १०२ कोटींच्या नोटांची किंमत अवघी शून्य! प्रकरण आता सुप्रीम कोर्टात



नवी दिल्ली : वृत्तसंस्था राज्यातील काही जिल्हा बँकांकडे कोट्यवधी रुपयांची रक्कम आहे. परंतु या रक्कमेचे मूल्य शून्य रुपये आहे. बँकेच्या हिशेबी ही रक्कम शिल्लक असली तरी आठ वर्षांपासून त्यांचा निर्णय लागत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटाबंदी जाहीर केली होती. त्या काळापासून राज्यातील आठ जिल्हा बँकांमध्ये कोट्यवधी रुपयांची रक्कम पडून आहे. १०१.१८ कोटींची रक्कमेचे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहचले आहे. त्यावर एप्रिल महिन्यात निकाल लागण्याची अपेक्षा बँकांना आहे.

८ नोव्हेंबर २०१६ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोट बंदीचा निर्णय घेतला. त्यानंतर बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंद असलेले चलन जमा करण्यात आले. राज्यातील आठ जिल्हा बँकेत तब्बल १०२ कोटी रुपयांची रक्कम तेव्हापासून पडून आहे. रिझर्व्ह बँकेच्या चुकीच्या धोरणामुळे हे पैसे अडकून पडले आहेत. सध्या हे प्रकरण सुप्रीम कोर्टात आहे. त्यामुळे जिल्हा बँकांचीही अडचण निर्माण झाली आहे. या नोटा हिशेबात धरायच्या का नाही? याबाबत बँका गोंधळात आहे. या प्रकरणी आता एप्रिल महिन्यांत सुनावणी होणार आहे, असे राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.

कोणत्या बँकेत किती नोटा? कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा बँकेकडे सर्वाधिक २५.३ कोटी रुपयांची रक्कम पडून आहे. त्यानंतर पुणे जिल्हा बँकेचा क्रमांक लागतो. पुणे जिल्हा बँकेतही २२.२ कोटी रुपये नोटीबंदीनंतरचे आहेत. नाशिक जिल्हा बँकेकडे २१.३ कोटी, सांगली जिल्हा बँकेकडे १४.७ कोटी, अहिल्यानगर जिल्हा बँकेकडे ११.७ कोटी, नागपूर जिल्हा बँकेकडे ५ कोटी, वर्धा जिल्हा बँकेकडे ७८ लाख तर अमरावती जिल्हा बँकेकडे ११ लाख रुपये पडून आहे. ही सर्व रक्कम १०१.२ कोटी रुपये आहे.

## रमजान ईद निमित्त माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा





उदगीर :- पवित्र रमजान महिन्यात सर्व मुस्लीम बांधवांकडुन उपवास करुन नमाज पठन केले जाते. या पवित्र महिन्यात मुस्लीम बांधव हे मानवाच्या कल्याणासाठी अजान पठन करुन अल्हाकडे प्रार्थना करतात. आपल्या उदगीर शहरात सामाजिक सलोखा कायम रहावा यासाठी सर्व जाती धर्माच्या नागरीकांनी बंधुत्वाची भावना जोपासुन पवित्र रमजान ईदच्या एकमेकांना शुभेच्छा देतात. विश्व शांतीसाठी मुस्लीम बांधवाकडुन नमाज पठन करुन मानव कल्याणासाठी प्रार्थना केली जाते असे मत माजी क्रीडा मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील ईदगाह मैदानावर मुस्लीम समाज बांधवांच्या 'ईद-उल-फित्र' कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा देताना बोलत होते. यावेळी इदगाह येथे सय्यद मुस्ताक अहमद खतीब यांनी नमाज़ आणी खुतबा दिला.बयान मुफ्ती हम्माद कुरैशी यांनी केले. यावेळी इदगाह कमेटी चे सय्यद मुजीब अहमद खातीब, समद बागवान, साबेर पटेल,सय्यद खमर इस्लाम, सय्यद एजाज खतीब, माजी आ.गोविंदराव केंद्रे, भरत चामले, समीर शेख, वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, अनिल मुदाळे, श्याम डावळे, श्रीरंग कांबळे, फय्याज शेख, नवनाथ गायकवाड, सनाउल्ला खान, बाळासाहेब मरलापल्ले, शफी हाशमी, शशिकांत बनसोडे, गिरीश उप्परबावडे, इम्तियाज शेख, अभिजित औटे, जितेंद्र शिंदे, संघशक्ती बलांडे, प्रदीप जोंधळे, शिवाजीराव देवनाळे, नरसिंग शिंदे, अतिक शेख, संदिप देशमुख, राजकुमार गंडारे, सतिश कांबळे, न्यानेश्वर बिरादार, राजकुमार चव्हाण, इब्राहिमनाना पटेल, अखिल मोमीन, अविनाश गायकवाड, देवेंद्र बिरादार, पाशा मिर्झा बेग, विलास शिंदे, बापू साळुंके, युसुफ बागवान, हिब्जु रहेमान हाशमी, सोनु हाशमी, शहबाज शेख, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, उदगीर मतदार संघात मुस्लिम बांधवांची संख्या ही मोठ्या प्रमाणात असुन या भागातील सर्व समाजाला आपण न्याय दिला आहे. विशेषत: मागील काळात मस्जिद परिसराचे सुशोभिकरण व संरक्षण भिंत, रस्ते, पाणी, वीज आदी सुख सुविधा उपलब्ध करुन देवून या समाजाचा विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. मला या समाजाने मदत केली असुन मी कायम आपल्यासोबत खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही आ.संजय बनसोडे यांनी दिली असुन येत्या काळात मुस्लीम समाजाच्या पाठीशी सदैव मी उभा असल्याचे सांगितले. यावेळी ईदगाह मैदानावर हजारो मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.अर्चनाताई पाटील यांच्या प्रयत्नाला यश अत्याधुनिक एसटी बसेसचे लोकार्पण

लातूर :- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या( एमएस आरटीसी )लातूर विभागात बी एस -६ मानांकनाच्या अत्याधुनिक पाच नव्या एसटी बस सेवेचा लोकार्पण कार्यक्रम आज लातूर बस स्थानकात भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते थाटात पार पडला.

या कार्यक्रमाला शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख अँड .बळवंतराव जाधव, भाजपाचे दिग्विजय काथवटे, प्रवीण सावंत, शिरीष कुलकर्णी संगीत रंदाळे, ओम धरणे ,गणेश गवारे ,गजेंद्र बोकन ,आबासाहेब चौगुले ,मीनाताई गायकवाड, हेमाताई येळे ,संगमेश्वर स्वामी यांच्यासह राज्यमार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय यंत्र अभियंता दिलीप जाधव, विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पडवळ, विभागीय उपयंत्र अभियंता संदीप मडावी, विभागीय सुरक्षा व दक्षता अधिकारी रंजीत यादव, विभागीय लेखा अधिकारी अमित गंडाळे, विभागीय सांख्यिकी अधिकारी अतुल वळसंकर, आगार व्यवस्थापक बाळासाहेब राठोड,स्थानक प्रमुख संतोष बिरादार, , सहाय्यक वाहतूक निरीक्षक व्यंकटराव बिरादार आदींची प्रमुख उपस्थिती होती.




मागील वीस दिवसापूर्वी म्हणजे ७ मार्च रोजी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मुंबई येथे भेट घेऊन लातूरच्या राज्य परिवहन विभागातील विविध समस्यांवर चर्चा केली होती. लातूर विभागास ७५ नवीन बसेसची उपलब्धता करून देण्याची मागणी केली होती. मंत्री महोदयांनी तात्काळ १०बसेस प्राथमिक स्तरावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला त्यानुसार आज लातूर विभागास त्यातील पाच बसेस उपलब्ध झालेल्या आहेत ;त्याचा लोकार्पण सोहळा आज मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभागास ७५नवीन बसेस मिळाव्यात, लातूर विभागातील ५९वाहनांचे आयुर्मान पूर्ण झाल्यामुळे ते मोडीत निघणार आहेत, वाहतुकीचे नियोजन करणे करिता मोडीत निघणारी ५९ तसेच स्थगित नियते चालू करण्यासाठी १६ अशी एकूण ७५नवीन वाहनांची आवश्यकता लातूर विभागाला असून, नागरिकांची गरज लक्षात घेता ७५नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी राज्य परिवहन मंडळाचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली होती .

लातूर आगारासाठी नवीन बसेस प्राप्त झाले असून उर्वरित बसेस लवकरच लातूर आगारात दाखल होणार आहेत नवीन बीएस- ६ मानक बससेवा अधिक सुरक्षित, आरामदायक आणि पर्यावरण पूरक प्रवासाचा अनुभव देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. या आधुनिक बसमधील तंत्रज्ञानामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. या लोकार्पण कार्यक्रमानंतर लातूर आगाराच्यावतीने डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर तसेच इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला . यावेळी माध्यमांशी बोलत असताना परिवहन विभागातील अनेक विकास कामे त्याचप्रमाणे बस स्थानकाचे श्रेणीवर्धन करण्याबाबतचा मंत्री महोदयांकडे पाठपुरावा चालू असून अत्यंत कमी वेळेमध्ये माननीय परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांनी बस उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे त्याचप्रमाणे राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री मा.ना.श्री देवेंद्रजी फडणवीस ,उपमुख्यमंत्री मा.ना.श्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री अजितदादा पवार व लातूरचे पालकमंत्री मा.ना.श्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आभार मानले एसटी लातूर आगार परिसरात सर्व मान्यवरांना या नवीन बस मध्ये सफर करून फेरफटका मारण्यात आला .डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या या प्रयत्नाबद्दल त्यांना लातूरकर धन्यवाद देत आहेत .प्रवासी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरलेले आहे.

## कर्जमाफी नाकारल्याने शेतकरी संकटात

मुंबई : राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेले कृषी कर्जमाफीचे आश्वासन आता शेतकरी आणि बँकांना अंगलट येण्याची शक्यता असून कर्जमाफी होणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितल्याने बँकापुढे आता कर्ज वसुलीचे मोठे आव्हान आहे. तर खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामातील कर्ज भरण्याचे आव्हान शेतक-यांपुढे असल्याने मोठे आर्थिक संकट शेतक-यांपुढे आ वासून उभे ठाकले आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये राज्यात विधानसभेचा निवडणूक पार पडली. त्यावेळी बहुतेक राजकीय पक्षांनी शेतक-यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. अगदी विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शेतक-यांना संपूर्ण कर्जमाफीची ग्वाही दिली होती. राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यातही संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन होते. परिणामी शेतर्कयांना मोठी आशा लागली आणि अनेकांनी खरीप हंगामातील कर्जाची परतफेड केली नाही.



निवडणूक संपताच सत्तेत आलेले महायुती सरकार निश्चितपणे कर्जमाफी करतील, या आशेने रब्बी हंगामाचेही कर्ज शेतक-यांनी थकविले. पण निवडणूक संपल्यानंतर नव्या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारने कर्जमाफीबद्दल कोणतीच ठोस भूमिका घेतली नाही.

## दवणगावचे सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह अनेकांचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपात प्रवेश

लातूर : - भारतीय जनता पार्टीचे नेते लातूर ग्रामीण विधानसभेचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रेणापूर तालुक्यातील मौजे दवणगाव येथील सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह अनेकांनी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.




भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विविध गावात विशेषता रेणापूर तालुक्यातील मौजे दवणगाव येथे विविध विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी मिळाला अनेक विकास कामांना गती मिळाली शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजना गरजू आणि पात्र बहुसंख्या लाभार्थ्यांना लाभ मिळाला.

दवणगाव येथे सध्या होत असलेली विकास कामे लक्षात घेऊन आणि भविष्यात या कामांना अधिक गती मिळावी याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह अनेकांनी लातूर येथील भाजपाच्या संपर्क कार्यालयात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, विधी आघाडीचे मनोज कराड, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, मुरढवचे सरपंच लक्ष्मण यादव, घनसरगावचे शरद दरेकर, दवणगावचे श्रीमंत नागरगोजे, सांगवीचे परमेश्वर जाधव, गुणवंत जोगदंड, बावचीचे नरेश चपटे, संतोष चव्हाण यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य रविकांत सुग्रीव नागरगोजे, उध्दव ग्याना नागरगोजे, किशन माणिक नागरगोजे, मुकुंद शंकर नागरगोजे, महादेव रंभाजी नागरगोजे, राम बलभीम काळसे, शिवाजी अंगद नागरगोजे, नागनाथ नागरगोजे, विभिषण बालासाहेब नागरगोजे, बाळासाहेब नागरगोजे, चंद्रकांत सोपान पाचाळ, दुर्गादास माने, भास्कर मधुकर नागरगोजे, अर्जुन सोपान नागरगोजे, व्यकटी सुग्रिन नागरगोजे, रंगनाथ हनुमंत मुंडे, ओम नागरगोजे व इतर अनेकांनी भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

## पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केली माहूर पोलीस ठाण्याची तपासणी

### पोलीस पाटील तसेच महिला दक्षता समितीसह मान्यवरांना केले संबोधित




किनवट: शेख शौकत :-माहूर पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणीच्या निमित्ताने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी माहूर पोलीस ठाण्याला भेट देऊन येथे पोलीस पाटील महिला दक्षता समितीसह नागरिकांचे गऱ्हाणे ऐकून घेत शिवप्रकाश मुळे यांचे सह पोलीस ठाण्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सपोनी शिवप्रकाश मुळे यांना रिवार्ड देऊन त्यांचे अभिनंदन केले दि २९ रोजी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी वार्षिक तपासणी निमित्त माहूर पोलीस ठाण्याला भेट दिली येथे सपोनी शिवप्रकाश मुळे यांचे सह अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांचा सलामी देऊन सन्मान केला यावेळी पोलीस विभागाअंतर्गतच्या सर्व तपासणी अंती माहूर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष कामगिरी बजावल्याने त्यांचे अभिनंदन केले तसेच यावेळी आलेल्या पोलीस पाटील व महिला दक्षता समितीच्या मान्यवरांना त्यांनी संबोधित करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन यावेळी केले वाई बाजार येथील पोलीस ठाण्याची गरज पाहता येथे पोलीस मदत केंद्राचे उद्घाटनही त्यांनी यावेळी वाई बाजार येथे जाऊन केले यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक उदय खंडेराय उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे परीक्षा विधीन अधिकारी किरण पोपळघट सपोनी शिवप्रकाश मुळे सपोनी रमेश जाधवर सपोनी शेख गफार पोउपनी पालसिंग ब्राह्मण पोउपनी आने बोईनवाढ यावेळी पेंटर सुरेश आराध्ये यांनी रांगोळी द्वारे शहाजी उमाप यांचे रांगोळीतून छायाचित्र काढल्याने त्यांची स्तुती केली यावेळी सर्व अधिकारी कर्मचारी सर्व तालुक्यातील सर्व मान्यवर उपस्थित होते.

## संपादकीय....

# घुसखोरांना इशारा

मानवी स्थलांतराची प्रक्रिया प्राचीन काळापासून सुरू झाली असून, जागतिकीकरणानंतर त्यास वेग आला आहे. मायदेश सोडून अन्यत्र स्थायिक होऊ पाहणार्यांचे प्रमाण अन्य कोणत्याही देशाच्या तुलनेत भारतात सर्वाधिक आहे. दरवर्षी विविध देशांतील सुमारे ५० हजार लोक अन्य देशांत जाऊन स्थायिक होतात; मात्र त्यातील ९५ टक्के संख्या ही विकसनशील देशांतून विकसित देशांत स्थलांतर करणार्यांची असते. सुमारे तीन कोटी भारतीय १८९ देशांत स्थलांतरित झाले आहेत. जगभरातून संपत्ती कमवून मायदेशात पैसे पाठवणार्यांमध्येही सर्वाधिक संख्या भारतीयांचीच आहे. त्यांच्याकडून वर्षाला ७५ अब्ज डॉलर इतकी संपत्ती भारतात येते; मात्र अमेरिकेसारख्या देशात बेकायदेशीररीत्या काही भारतीय राहिले असून, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांची हकालपट्टी केली, तेव्हा त्यास भारताने आक्षेप घेतला नाही. त्या त्या देशाचे कायदे मोडणार्यांचे आम्ही समर्थन करत नाही, ही मोदी सरकारची सुस्पष्ट भूमिका आहे. त्याच धर्तीवर अन्य देशांतून भारतात येणार्यांबाबतही सरकारचे धोरण आहे. देशाच्या विकासात योगदान देणार्या विदेशी लोकांचे स्वागतच केले जाईल; मात्र सुरक्षेला धोका ठरणार्यांना इथे राहू दिले जाणार नाही. भारत म्हणजे धर्मशाळा नव्हे, असा खणखणीत इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यासंदर्भाने लोकसभेत देत धोरण स्पष्ट केले. 'आओ जाओ घर तुम्हारा' असा गलथानपणा काँग्रेसच्या राजवटीत झाला; पण आम्ही असे होऊ देणार नाही, हे कोणीतरी सांगणे गरजेचे होते. अवैध कागदपत्रांसह भारतात वास्तव्य करणार्यांवर करडी नजर ठेवली जाईल आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल. सरकार घुसखोरांची गय करणार नाही, असे शहा यांनी बजावताना देशाच्या भविष्यकालीन कठोर धोरणाचे संकेत दिले.

भारत-बांगला देशमधील दोन हजार किलोमीटरच्या सीमेपैकी ४५० किलोमीटरवर कुंपण घालण्याचे काम झाले आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील पश्चिम बंगाल सरकारने बांगला देशी घुसखोरांना अभय दिले आहे. त्यांच्याकडे बनावट कागद आढळलेली आहेत, असा केंद्र सरकारचा आरोप आहे. आता केंद्राने स्थलांतर व विदेशी नागरिकांसंदर्भातील विधेयक लोकसभेत मांडले असून, ते आवाजी मतदानाने मंजूरही करण्यात आले. देशाची सुरक्षा आणि अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी उत्पादन व व्यापाराला चालना आणि विद्यापीठांना आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी सदर विधेयक आवश्यक असल्याचे गृहमंत्र्यांनी म्हटले आहे. यापूर्वी बि-टिश काळात स्थलांतर व विदेशी नागरिकांसंदर्भात १९२०, १९३९ व १९४६ अशी तीन विधेयके संमत केली गेली; पण बदलत्या संदर्भात नवीन आणि कडक कायदा करण्याची गरज होतीच. या विधेयकानुसार, भारतात प्रवेश करण्यासाठी, राहण्यासाठी किंवा देश सोडण्यासाठी बनावट पासपोर्ट किंवा व्हिसाचा वापर करताना आढळल्यास ७ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. एवढी कडक शिक्षा असल्यामुळे भारतात बेकायदेशीररीत्या भारतात रहिवास करणार्यांवर वचक बसेल. हॉटेल, शैक्षणिक संस्था व रुग्णालयांमधील विदेशी नागरिकांविषयी माहितीचा अहवाल सक्तीचा करण्यात आला आहे. त्यामुळे विहित कालावधीपेक्षा जास्त काळ राहणार्यांवर पाळत ठेवता येऊ शकेल; मात्र या नियमाची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे. बनावट पासपोर्ट, व्हिसा व कागदपत्रे पुरवणार्या व्यक्तीला २ ते ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १ लाखापर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. देशात असे रॅकेट चालवणार्या दलालांची संख्या मोठी आहे. हे रॅकेट देशातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असल्याचे दिसते. त्यांना वेसण घालण्याची गरज होतीच.

आसाममध्ये जाहीर झालेल्या वादग्रस्त 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स'ने तेथील ४० लाख नागरिक बेकायदेशीररीत्या राहणारे, विदेशी असल्याचे म्हटले होते. शेजारील बांगला देशातून मोठ्या प्रमाणावर बेकायदा स्थलांतर होत असते. १९७१ ला झालेल्या युद्धात हजारो लोकांनी आसाममध्ये पलायन केले होते. आसामच्या ३३ पैकी १५ जिल्ह्यांत ही संख्या जास्त आहे. मुंबईसारख्या महाराष्ट्राच्या राजधानीच्या शहरात सायन-कोळीवाडा, वडाळा, देवनार, मान खुर्द अशा भागात बांगला देशीयांच्या वस्त्या आहेत. महाराष्ट्रात रोहिंग्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत असल्याची माहिती समोर येत असते. यापूर्वी केंद्र सरकारने नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणून बांगला देश, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या देशांतील सहा धार्मिक अल्पसंख्याकांना (हिंदू, बौद्ध, जैन, पारसी, ख्रिश्चन आणि शीख) भारताचे नागरिकत्व देण्याचा निर्णय घेतला. शेजारील देशांत अन्याय-अत्याचार होत असल्यास त्यांना आता भारतात कायमस्वरूपी येणे शक्य झाले. मुळात भारतातच उच्च शिक्षणाचा दर्जा आणि सुविधा वाढत आहेत; पण भारतात कोण प्रवेश करत आहे, तो किती काळासाठी आहे आणि तो कशासाठी आहे, हे आता बारकाईने पाहिले जाणार आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव प्रवेश नाकारण्याचा सरकारला अधिकार आहे; पण इराणमधून अनेक वर्षांपूर्वी पारसी लोक भारतात आले आणि सलोख्याने ते येथे नांदत आहेत. इस्रायलमधून असंख्य ज्यू भारतात आले आणि येथील प्रवाहात सामील झाले. भारताची अर्थव्यवस्था आज जगात पाचव्या क्रमांकाची असून त्यामुळे या देशाचे आकर्षण जगाला असणे स्वाभाविक आहे. ज्यांना भारताच्या विकास प्रक्रियेत आपला वाटा उचलायचा आहे, त्यांचे स्वागतच आहे; मात्र ज्यांना देशात येऊन संघर्ष वाढवायचा आहे, त्यांच्या विरोधात कठोर पावले उचलले जातील, हे गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले, ते बरेच झाले. या संदर्भात बांगला देश आणि रोहिंग्यांकडे त्यांनी निर्देश केला आहे.

# बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण - रमजान !

ईद हा आनंदाचा सण आहे जरी हा प्रामुख्याने इस्लामचा सण असला तरी, आज जवळजवळ सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन हा सण साजरा करतात. खरं तर या सणापूर्वी सुरू होणाऱ्या पवित्र रमजान महिन्यात, इस्लाम धर्माचे लोक संपूर्ण महिनाभर उपवास ठेवतात. मुस्लिमांनी या महिन्यात उपवास ठेवणे अनिवार्य आहे कारण त्यांचा असा विश्वास आहे की यामुळे अल्लाह प्रसन्न होतो. हा सण एखाद्याच्या धर्माप्रती त्याग आणि समर्पणाचे प्रतिबिंबित करतो. हे दाखवते की मानवाने आपल्या मानवतेसाठी आपल्या इच्छांचा त्याग केला पाहिजे जेणेकरून एक चांगला समाज निर्माण करता येईल. ईद-उल-फित्र एक दिवस आधी चंद्र पाहून निश्चित केला जातो. सौदी अरेबियामध्ये एक दिवस आधी आणि भारतात एक दिवस नंतर चंद्र दिसत असल्याने ईद दोन दिवस साजरी केली जाते. ईद हा एक महत्त्वाचा सण आहे म्हणून या दिवशी सुट्टी असते. ईदच्या दिवशी सकाळपासून त्याची तयारी सुरू होते.

रमजानचा चंद्र मावळल्यानंतर आणि ईदचा चंद्र दिसल्यानंतर पहिल्या दिवशी मुस्लिम धर्मियांचा ईद हा सण साजरा केला जातो, ही इस्लाममधील दोन ईदांपैकी एक आहे. इसवी सन् ६२४ मध्ये बद्रच्या लढाईनंतर पैगंबर मुहम्मद यांनी पहिली ईद उल-फित्र साजरी केली. ईद उल फित्रच्या निमित्ताने अल्लाहचे श्रद्धावान संपूर्ण महिना अल्लाहची पूजा करतात, उपवास ठेवतात आणि कुराण पठण करून त्यांचे आत्मे शुद्ध करतात, ज्याचे बक्षीस किंवा वेतन मिळण्याचा दिवस ईदचा दिवस म्हणून ओळखला जातो, जो जगभरातील मुस्लिम मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतात. ईद उल-फित्रचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे गरिबांना फित्र देणे बंधनकारक आहे, जेणेकरून जे लोक गरीब आहेत आणि त्यांची ईद साजरी करण्यास भाग पाडले आहेत, ते नवीन कपडे घालू शकतील आणि समाजात एकमेकांसोबत आनंद वाटू शकतील. ज्यांच्याकडे ५२.५० तोळा चांदी किंवा ७.५० तोळा सोने आहे त्यांच्यावर फित्र अनिवार्य आहे. त्यांनी स्वतःसाठी आणि त्यांच्या अल्पवयीन मुलांसाठी सदका-ए-फित्र द्यावे, जे ईद-उल-फित्रच्या नमाजपूर्वी करावे लागेल. ईद हा बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण आहे, ईदच्या दिवशी लोक एकमेकांच्या हृदयातील प्रेम वाढवण्यासाठी आणि द्वेष दूर करण्यासाठी एकमेकांना मिठी मारतात.

रमजान हा इस्लामिक कॅलेंडरचा नववा महिना आहे, ज्यात कुराण इस्लामी संदेष्टा मुहम्मद यांना अवतरले आहे. जगभरातील मुस्लिम प्रार्थना, प्रतिबिंब आणि समुदाय, उपवासाचा महिना (सॉम) म्हणून पाळतात. मुहम्मद (सल्ल)च्या पहिल्या प्रकटीकरणाची आठवण म्हणून रमजान महिन्यातील उपवास हा इस्लामच्या पाच स्तंभापैकी एक आहे आणि चंद्रकोर चंद्राच्या एका दिसण्यापासून दुसऱ्यापर्यंत, एकोणतीस ते तीस दिवस टिकते. पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास करणे हे सर्व प्रौढ मुस्लिमांसाठी अनिवार्य आहे, त्यामुळे ते या महिन्यात मुस्लिम लोक पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत दिवसाच्या प्रकाशात उपवास करून घालवतात. जे तीव्र किंवा दीर्घकाळ आजारी नसलेले, प्रवास करणारे वृध्द, स्तनपान करणारे मधुमेह किंवा मासिक पाळीत आहेत. पहाटेच्या जेवणाला सुहूर असे संबोधले जाते आणि रात्रीच्या जेवणाला इफ्तार म्हणतात. मध्यरात्री सूर्य किंवा ध्रुवीय रात्र असलेल्या प्रदेशात राहणाऱ्या मुस्लिमांनी मक्काचे वेळापत्रक पाळावे, असे फतवे जारी केले गेले असले तरी सर्वात जवळच्या देशाचे वेळापत्रक पाळण्याची प्रथा आहे, ज्यात रात्र दिवसापासून वेगळी केली जाऊ शकते. असे मानले जाते की उपवासाचे आध्यात्मिक बक्षिसे रमजानमध्ये वाढतात. त्यानुसार मुस्लिम केवळ खाण्यापिण्यापासूनच नव्हे तर तंबाखूजन्य पदार्थ, लैंगिक संबंध आणि पापी वर्तनापासूनही परावृत्त करतात, नमाज आणि कुराण पठण करण्याऐवजी स्वतःला समर्पित करतात.

उपवास संपल्याच्या आनंदाव्यतिरिक्त, या ईदच्या दिवशी मुस्लिम अल्लाहचे आभार मानतात कारण अल्लाहने त्यांना महिनाभर उपवास ठेवण्याची शक्ती दिली. तथापि, उपवास करून मोक्ष कधीच शक्य नाही कारण पवित्र शास्त्रांमध्ये त्याचा उल्लेख नाही. पवित्र कुराण शरीफमध्ये बख्बर संतांकडून योग्य उपासनेचा मार्ग स्वीकारून पूर्ण मोक्ष मिळविण्यासाठी सर्वशक्तिमान अल्लाहची उपासना करण्याची सूचना देखील दिली आहे. ईदच्या काळात कुटुंब आणि मित्रांमध्ये भेटवस्तूंची देवाणघेवाण होते. शेवई हा या सणातील सर्वात महत्त्वाचा पदार्थ आहे, जो प्रत्येकजण मोठ्या आवडीने खातात. ईदच्या दिवशी प्रत्येक मुस्लिमाने मशिदींमध्ये सकाळच्या नमाजपूर्वी दान किंवा दान करणे बंधनकारक आहे, या देणगीला 'जकात उल-फित्र' म्हणतात. हे दान कोणत्याही दैनंदिन अन्नपदार्थाचे दोन किलोग्रॅम असू शकते, उदाहरणार्थ पीठ किंवा त्या दोन किलोग्रॅमच्या किमतीचे देखील. त्यानंतर ही जकात गरिबांमध्ये वाटली जाते.

इस्लामी दिनदर्शिका चंद्रावर अवलंबून आहे, जिथे प्रत्येक महिन्याची सुरुवात होते, जेव्हा नवीन चंद्राची पहिली चंद्रकोर दिसते. इस्लामी वर्षात १२ चंद्र चक्रे असतात आणि परिणामी ते सौर वर्षापेक्षा १० ते ११ दिवस लहान असते आणि त्यात कोणतेही अंतर नसल्यामुळे रमजान संपूर्ण ऋतूंमध्ये स्थलांतरित होते. इस्लामी दिवस सूर्यास्तानंतर सुरू होतो. अनेक मुस्लिम रमजानच्या सुरुवातीस चंद्राच्या स्थानिक भौतिक दर्शनाचा आग्रह धरतात, परंतु इतर लोक महिन्याची सुरुवात निश्चित करण्यासाठी नवीन चंद्राची गणना केलेली वेळ किंवा सौदी अरेबियाची घोषणा वापरतात. जागतिक स्तरावर नवीन चंद्र एकाच वेळी एकाच स्थितीत नसल्यामुळे, रमजानच्या सुरुवातीच्या आणि समाप्तीच्या तारखा प्रत्येक संबंधित स्थानावर कोणत्या चंद्राचे दर्शन घेतात यावर अवलंबून असतात. परिणामी रमजानच्या तारखा वेगवेगळ्या देशांमध्ये बदलतात परंतु सामान्यतः फक्त एका दिवसाने, हे चंद्राच्या चक्रामुळे होते. चंद्र मेण चंद्रकोर म्हणून पात्र होण्यासाठी निकष पूर्ण करू शकत नाही, जे एका ठिकाणी सूर्यास्ताच्या वेळी आणि नंतर दुसऱ्या ठिकाणी भेटेल तेव्हा महिन्यांतील बदलाचे वर्णन करते. खगोलशास्त्रीय अंदाज जे रमजानची सुरुवात अंदाजे उपलब्ध आहेत.

इस्लामच्या मते कुराण या महिन्यात सर्वात खालच्या स्वर्गात पाठवण्यात आले होते, अशा प्रकारे जिब्राईलने मुहम्मद यांना हळूहळू प्रकटीकरणासाठी तयार केले होते. म्हणून मुहम्मद यांनी आपल्या अनुयायांना सांगितले की स्वर्गाचे दरवाजे संपूर्ण महिनाभर उघडे राहतील आणि नरकाचे दरवाजे (जहन्नुम) बंद होतील. पुढील महिन्याचे पहिले तीन दिवस, शव्वाल, उत्सवात घालवले जातात आणि 'ब्रेकिंग फास्टचा सण' किंवा ईद अल-फितर म्हणून साजरा केला जातो. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या या पवित्र प्रसंगी अल्लाह तुम्हा सर्वांना आनंद देवो आणि तुमच्या प्रार्थना स्वीकारो, सर्वांना ईद-ए-मिलाद-उन-नबी मुबारक!

************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# शक्तीशाली भूकंपाने म्यानमार-थायलंड हादरवले ;अशाप्रकारे नैसर्गिक महाप्रलय जगात कुठेही येवू शकतात ;सावधान!

दिनांक २८ मार्च २०२५ ला म्यानमार-थायलंडचा ७.७ तीव्रतेचा भयावह भूकंप तेथील जनतेसाठी अंधक्कारात नेणारा ठरला व यामध्ये शेकडोच्या संख्येने जिवितहानी झाली असून लाखोंच्या संख्येने गंभीर जखमी झालेत व अनेकजन अजुनही ढीगाऱ्यामध्ये दबलेले आहेत.हे दृश्य पाहून अंगावर शहारे येतात.म्यांमार-थायलंड किंवा अन्य ठिकाणी भयावह भूकंप किंवा महाप्रलय का येतात!याचे जिवंत उदाहरण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अन्याय व अत्याचार होय.आज मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आकाश-पाताळ -पृथ्वी, चंद्र-सुर्य, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण,ग्रह-तारे या सर्वांवर अतीक्रमन करून स्वतःसाठी सुखसुविधा निर्माण केल्या. परंतु या सुखसुविधा विनाशाकडे नेणाऱ्या आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज म्यानमार-थायलंड सारख्या जगातील अनेक देशांना भोगावे लागत आहेत व पुढेही मोठ्या प्रमाणात भोगावे लागण्याचे चिन्ह दिसत आहे. आज मानवाने केलेल्या प्रगतीचा दुरूपयोग होत असल्याने भूकंप, सुनामी, महाप्रलय,वनवे लागने,अती उष्णता,अती पाऊस,अती थंडी, ग्लेशियर वितळणे,ज्वालामुखीचा उद्रेक, समुद्राची पातळी वाढने, भुजलसाठा दिवसेंदिवस कमी होणे या संपूर्ण विनाशकारी उद्भवणाऱ्या घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहे.कारण वाढते शहरीकरण,औद्योगिकीकरण व सुखसुविधा याकरीता मोठ्या प्रमाणात जगात जंगलतोड सुरूच आहे. यामुळे पृथ्वीच्या पोटात ज्या प्रमाणात पाणी साठा किंवा भुजलसाठा पाहिजे होता तो साठा अजीबात नसुन; जो आहे तोही दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे.यामुळे जगात मोठ्या प्रमाणात वनव्याच्या घटना, भूकंप,ज्वालामुखीचा उद्रेक वाढतांना दिसतात. त्याचप्रमाणे ज्वालामुखीचा उद्रेक यांचेही मुख्य कारण जंगलतोड व बदलत्या हवामानामुळे होत आहे हे भयावह दृश्य आज आहे आणि पुढे चालून उग्र रूप धारण करून महाभयानक होण्याचे संकेत दिसत आहे. जग निर्मात्या संपूर्ण धर्मांच्या देवी-देवतांनी मानवाला जन्माला यासाठी घातले की या पृथ्वीतलावर एकतरी बुध्दीजीवी प्राणी असावा जेणेकरून तो संपूर्ण मानवजातीसह, मुक्या प्राण्यांची, संपूर्ण जीवजंतू, पशुपक्षी, निसर्ग व पृथ्वी यांचे रक्षण करू शकला पाहिजे.परंतु आज मानवाने स्वतःच्या फायद्यासाठी व स्वार्थासाठी संपूर्ण सीमारेषा ओलांडून आज पृथ्वीवरील संपूर्ण प्राणीमात्रांचा जीव धोक्यात टाकला आहे व याचे जिवंत उदाहरण म्हणजे म्यानमार-थायलंडमध्ये ७.७ तीव्रतेचा आलेल्या भूकंपाने संपूर्ण अस्तव्यस्त करून हाहाकार निर्माण केला.आज जगातील अनेक देश आगीशी खेळतांना दिसतात यात अमेरिका, रशिया, युक्रेन, इजरायल, इराण, पोलंड,चीन, उत्तर कोरिया इत्यादीसह अनेक देश एकमेकांवर बंदुका तानुन बसले आहेत व मोठ्या प्रमाणात बॉम्ब वर्षाव करीत आहे यामुळे सर्वत्र आगडोंब उसळल्याचे दिसून येते आणि हे सर्व वर्चस्वाच्या लढाईसाठी आहे.याकरीता एकमेकांना मोठ्या प्रमाणात विनाशकारी युद्ध सामुग्रीची देवाणघेवाण सुध्दा करीत आहेत.यामुळे अनेक देश युध्दाच्या खाईत लोटल्याने तीथे फक्त आगीचे गोळे बरसतांना दिसतात. आज जगातील करोडो एकर भुभागांची राखरांगोळी झालेली आहे व अनेक मोठमोठी जंगले आताही जळत आहे.जगातील संपूर्ण देश आज बारूतच्या ढीगाऱ्यावर बसले आहे. एवढे नुकसान डोळ्यासमोर असुनही रशिया -युक्रेन, इजरायल-इरान,हमास सह अनेक देश एकमेकांना संपविण्याची भाषा करीत आहे व युद्ध सामुग्रीच्या शर्यतीत चढा-ओढ सुरू आहे.म्हणजेच आज जग किती विनाशाकडे जात आहे हे चित्र स्पष्ट दिसून येते. जगातील काही देश गृहयुद्धाने भरडलेले आहेत त्यामुळे तीथेही रक्ताच्या नद्या वाहतांना दिसतात.पृथ्वीचा व निसर्गाचा विनाश वेळीच रोखला गेला नाही तर धरणीमाता पृथ्वीतलावर असणाऱ्या संपूर्ण जीवसृष्टीला गीळंकृत केल्याशिवाय राहणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे जगातील नेत्यांनो आतातरी सावधान व्हा व पृथ्वीला वाचवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करा अजुनही वेळ गेलेली नाही.कारण मानवाने आपल्या सुखसुविधांसाठी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.या पृथ्वीतलावर लाखो प्रजातीचे प्राणी, पशुपक्षी, जीवजंतू वास्तव करतात. परंतु यात बुध्दीजीवी जात एकच आहे ती म्हणजे मानव आणि एकट्या मानवाने ही विनाशलिला उभी केली आहेत.त्यामुळे जगात दिवसेंदिवस भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे आणि याला मुख्य कारणीभूत फक्त बुध्दीजीव प्राणी म्हणजे मानवच आहे. जगात दिवसेंदिवस विनशलिला वाढतच आहे तरीही मानलाचा निसर्गावर व पृथ्वीवर होणारा अत्याचार अजुनपर्यंत थांबलेला नाही हे मानवजातीचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.मानवाने आपला अतिरेक वेळीच थांबविला नाही तर म्यांमार-थायलंड पेक्षाही भयावह भुकंप किंवा महाप्रलय जगाच्या कानाकोपऱ्यात केव्हाही कधीही उद्भवू शकतात यालाही नाकारता येत नाही. असे सांगितले जाते की म्यांमार -थायलंडमध्ये आलेला भूकंप हा २०० वर्षांपूर्वी आलेल्या भूकंपापेक्षाही घातक असल्याचे सांगितले जाते.भारतात गुजरात मधील भुजमध्ये २६ जानेवारी २००१ ला ७.७ तीव्रतेचा भूकंप आलेला होता.तेव्हा या भूकंपात २० हजार लोकांचा मृत्यू झाला होता व दिड लाखांपेक्षा जास्त लोक गंभीररीत्या जखमी झाले होते आणि मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली होती. वैज्ञानिकांकडुन सांगितले जाते की भूकंपचा केंद्र असलेला म्यानमार मधील मांडाले क्षेत्र संवेदनशीलमध्ये गणल्या जाते. भारतीय आणि यूरेशियन प्लेट यांच्यात टकराव झाल्याने २८ मार्चला भिषण भूकंप आला.या सर्वच घटनांना कारणीभूत आपणच आहोत.आज युद्धजन्य परिस्थिती व बदलते हवामान यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे संपूर्ण परिस्थिती पाहता जगातील संपूर्ण देशांनी येणाऱ्या नैसर्गिक आपदांपासुन सावध रहाण्यासाठी निसर्गाची जोपासना केली आहे.कारण म्यानमार -थायलंड आलेल्या अती तीव्रतावाल्या भुकंपाने भारतातील अरूणाचल प्रदेश,पश्चिम बंगाल येथे झटके जानवले सोबतच चीन, व्हियेतनाम,तायवान, आणि लाओस याठिकाणी सुध्दा भूकंपाचे झटके जानवले.म्हणजे नैसर्गिक आपदा केव्हा व कुठे येईल हे सांगता येत नाही.आग व पाणी यांच्याशी खेळू नका कारण आग केव्हा भस्मसात करेल ते सांगता येत नाही व पाणी केव्हा कुठे वाहुन नेईल व डुबवेल हेही सांगता येत नाही त्यामुळे सावधान!कारण या जखमा कधीच भरून निघु शकत नाही.त्यामुळे जगातील देशांनो पृथ्वीच्या रक्षणासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करा तेव्हाच आपण येणाऱ्या नैसर्गिक महाप्रलयाला थोडा का होईना अंकुश लावु शकु.

*********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# शेतीच्या सिंचनाचा प्रश्न बिकट

१९९५ मध्ये कोकण सिंचन पाटबंधारे महामंडळ स्थापन करून कोकणचे ४७ पाटबंधारे प्रकल्प या महामंडळाकडे सोपवण्यात आले. मात्र गेल्या ३० वर्षांत देवघर वगळता एकही पाटबंधारे प्रकल्प पूर्णत्वाला न गेल्याने तहानलेल्या कोकणला पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी वणवण वर्षागणिक वाढत आहे. यामुळे पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीच्या सिंचनाचा प्रश्न बिकट बनला आहे. कोकणचे शेती क्षेत्र सध्या ४० टक्के घटले असून फळ बागायतीसह भात शेतीत अग्रेसर असणारा कोकण शेती क्षेत्रात मागे पडत आहे. याची दखल आता तरी सरकार घेणार का, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

सिंधुदुर्गात टाळंबा, जामदा, सातरंडी, नरडवे, कुंभवडे असे महत्त्वाचे पाटबंधारे प्रकल्प निधीअभावी रखडलेले आहेत. रत्नागिरी, रायगड, पालघर जिल्ह्यांतही जवळपास २५ प्रकल्प रखडलेले आहेत. या सर्व अपुर्या राहिलेल्या प्रकल्पांमुळे कोकणच्या शेतीचा आणि त्याचबरोबर कोकणच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जटिल अवस्थेत आहे. एका बाजूला कोकणातील पाच हजार कोटींचे जलसिंचन प्रकल्प रखडलेले आहेत; तर दुसर्या बाजूला कोकणातील पाणी उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वळवण्यासाठी १४ हजार कोटींची योजना सरकारने तयार केली आहे. कोकणला ३ हजार ५०० मि.मी. पाऊस पडूनही फेब्रुवारीनंतर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो. ही अवस्था एका बाजूला आणि दुसर्या बाजूला पाणी वळवण्यासाठी नवे प्रकल्प तयार केले जात आहेत. सरकारी कारभाराचा हा विरोधाभास जनमानसाच्याच मुळावर येत आहे. खरं तर ज्या प्रकल्पांवर कोट्यवधींचा खर्च यापूर्वी झाला आहे, ते प्रकल्प पूर्ण केले जातील असे एका बाजूला सरकार सांगत आहे आणि दुसर्या बाजूला नवे प्रकल्प घोषित करत आहे. परिणामी जुने प्रकल्प कागदावरच राहात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकूण सरकारी अनास्थाही मूलभूत प्रकल्पांच्या मुळावर येत आहे.

कोकणात हापूस आंबा, वाडा कोलम, जांभुळ, चिकू, कोकम, काजू अशा फळांना राष्ट्रीय मानांकन दिले जात आहे. या पिकांचे वैशिष्ट्य यामुळे अधोरेखित होत आहे. परंतु या पिकांची लागवड करण्यासाठी आवश्यक पाणी मिळत नाही. यासाठी नियोजित केलेले पाटबंधारे प्रकल्प हे वर्षानुवर्षे पूर्ण होत नाहीत. या सरकारी कारभाराच्या अनास्थेचा फटका शेती विस्तारावर होताना दिसत आहे. नवे सरकार आले की नव्या योजना जाहीर होतात आणि जुने प्रकल्प गुंडाळले जातात, असेच काहीसे चित्र हे कोकणच्या पाटबंधारे प्रकल्पांबाबत पाहायला मिळत आहे. त्यामुळे वर्षानुवर्षाचे कोकणच्या पाटबंधारे प्रकल्पांचे दुखणे मागच्या पानावरून पुढे सुरू आहे. कोकण सिंचन महामंडळावर २०१४ मध्ये भ्रष्टाचाराचे आरोप झाले. रायगड जिल्ह्यातील बाळगंगा, कोंढाणे हे प्रकल्प त्यामुळे गुंडाळण्यात आल्यात जमा आहे. या प्रकल्पांच्या चौकशा जाहीर झाल्या. पण त्याचा कुठलाही अहवाल आलेला नाही. ज्यांच्यावर आरोप आहेत, तेच आज सरकारबरोबर आहेत. त्यामुळे आता तरी या प्रकल्पांना नवसंजीवनी मिळणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एकूण कोकणातील पाणीटंचाईग्रस्त गावांची संख्या आता शेकड्यांतून हजारांवर गेली आहे. मुंबईसह महानगरांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी सिंचनाचे पाणी पिण्यासाठी द्यावे लागत आहे. पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाचे पाणी वसई-विरार, मीरा-भाईंदर या शहरांना द्यावे लागल्याने या जिल्ह्यातील १४ हजार एकर क्षेत्र सिंचनातून बाद झाले आहे. अशा शेतीवरील संकटामुळे कोकणची शेतीही अडचणीत येऊ लागली आहे. यावर एक धोरणात्मक निर्णय घेऊन काम करण्याची गरज आहे. कोकणात वाढते औद्योगिक प्रकल्प व त्यांना लागणारे पाणी यामुळे धरणातील पाण्याचा बराचसा भाग औद्योगिक प्रकल्पांना दिला जातो. परिणामी रायगड जिल्ह्यात सुमारे २० टक्के भात शेती क्षेत्र घटले आहे; तर दक्षिण कोकणात शेती करावी तर पाणी नाही, रोजगाराच्या संधी नाहीत म्हणून लाखो लोकांचे स्थलांतर मुंबईत झाले आहे. परिणामी कोकणातील खेड्यांमधील लोकसंख्या घटली आणि गावांमध्ये बंद घरांची संख्या वाढली आहे. या सर्व परिस्थितीवर योग्य निर्णय घेऊन उपाय शोधणे आता गरजेचे आहे.

# बिमाटाच्या वतीने विमानतळावर बुद्धमूर्ती लोकार्पण सोहळ्याचे आयोजन.

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : दि. २८ मार्च २०२५ शुक्रवारला, सकाळी ठीक १० वाजता भव्य बुद्धमूर्ती प्रतिष्ठापणा व लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा ऐतिहासिक सोहळा छत्रपती संभाजीनगर शहरातील विमानतळ परिसरात संपन्न होणार आहे. या प्रसंगी मा. संजयजी शिरसाट (पालकमंत्री छत्रपती संभाजीनगर व सामाजिक न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते या बुद्ध मुर्तीचे लोकार्पण होणर आहे. याप्रसंगी सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून उदयजी सामंत (उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य) व मा. अतुलजी सावे (इतर मागास, बहुजन कल्याण, दुग्ध विकास व ऊर्जामंत्री महाराष्ट्र राज्य) हे उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी पुज्य भदंत बोधीपालोजी महाथेरो व भिक्खु संघाच्या वतीने प्रतिष्ठापणा पूजा व धम्म देसना होणार आहे. सदर कार्यक्रमासाठी इतर मान्यवर लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी, कर्मचारी वर्ग, बुद्धिष्ट इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स एंड ट्रेडर्स असोसिएशन (बिमाटा) संघटनेचे सर्व सदस्य सहकुटुंब उपस्थित राहणार आहेत. तसेच शहरातील इतर औद्योगिक, सामाजिक संघटनेचे सर्व पदाधिकारी सदस्य तसेच शहरातील सन्माननीय हितचिंतक नागरिक देखील या लोकार्पण सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत.





जी-२० च्या अनुषंगाने शहर सुशोभिकरणासाठी अनेक औद्योगिक व सामाजिक संघटना तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी जी-२० च्या आयोजनामध्ये शहराच्या सौंदर्यकरणाच्या दृष्टीने केलेल्या कार्यात बिमाटाचा सुद्धा उल्लेखनीय सहभाग होता, तेव्हा असे सुचले की, छत्रपती संभाजीनगर शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या अनुषंगाने जागतिक वारसा असलेले अजिंठा व वेरूळ लेणी याच परिसरात असल्याने बुद्धिझमचे जगाला दर्शन व्हावे असे अपेक्षित आहे. तरी त्यासाठी जगामधून येणारे प्रवासी हे सर्वसाधारणपणे विमानाने येतात. आल्याबरोबर त्यांच्या दृष्टीस बुद्ध मूर्ती जर दिसली तर त्यांना लगेचच ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगर शहराचा प्रत्यय येऊ शकतो म्हणून आम्ही बिमाटा सदस्यांनी पुढाकार घेऊन तत्कालीन छत्रपती संभाजीनगर विमानतळ प्राधिकरणाचे प्रमुख श्री. ज्ञानदीप साळवे साहेबांकडे तसा प्रस्ताव सादर केला. त्यांनी प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी पाठविला. ११ जानेवारी २०२३ रोजी प्राधिकरणाची मंजुरी मिळाली, मग त्यानंतर वेगवेगळ्या बुद्धरुपांचा शोध घेतला व नंतर हैद्राबाद येथील हुसेन सागरामधील अभयमुद्रा असलेली बुद्ध मूर्ती आम्हाला योग्य वाटली. ती बुद्धमूर्ती बनविणा-याचा शोध घेऊन तेलंगणामधील आलागट्टा येथून १५.५ फुटाची अखंड बेंगलोरी ग्रेनाईटमध्ये हे बुद्धशिल्प बनवून घेतले. ५ मे २०२३ च्या बौद्ध पौर्णिमेला स्थानापन्न केले. तद्नंतर सुशोभिकरणाचे काम करून उद्या दि. २८ मार्च २०२५, शुक्रवारला सकाळी १० वाजता बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे.

हा सोहळा जगाला शांती, अहिंसा आणि बंधुत्वाचा संदेश देणारा ठरेल. या भूमिकेतून बुद्धिस्ट इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स एंड ट्रेडर्स असोसिएशनने हे काम केले आहे. असे संघटनेच्या वतीने कळविण्यात आले आहे. (टीप : या लोकार्पण सोहळ्यासाठी सर्वांनाच सामावून घेण्याची बिमाटा संघटनेची इच्छा होती, परंतु हा विमानतळ प्राधिकरणाचा परिसर अतिसंवेदनशील असल्यामुळे नाईलाजाने मोजक्याच निमंत्रितांच्या उपस्थितीत या सोहळ्याचे आयोजन करावे लागणार आहे, याची सर्व हितचिंतक, शुभेच्छूक व मान्यवर यांनी नोंद घ्यावी).

मिलिंद जी थोरात

अध्यक्ष : बुद्धिष्ट इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स एंड ट्रेडर्स असोसिएशन (बिमाटा)

# शैक्षणिक धोरण, व्यवस्थेवरून सोनिया गांधींची सरकारवर टीका

नवी दिल्ली : वृत्तसंस्था काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी भारताच्या नव्या शैक्षणिक धोरणावरुन मोदी सरकारवर शाब्दीक हल्ला चढवला आहे. त्यांनी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणावर कडाडून टीका केली. 'मोदी सरकार संघीय शिक्षण रचनेला कमकुवत करत आहे. ते '३ सी' एजेंडा पुढे चालवत आहेत. त्या माध्यमातून ते शिक्षण व्यवस्थेवर प्रहार करत आहेत' अशी टीका त्यांनी केली.

एका इंग्रजी वर्तमानपत्रात लिहिलेल्या लेखात सोनिया गांधी यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षणाचे केंद्रीकरण, व्यावसायिकरण आणि सांप्रदायिकीकरण सुरु असल्याचे म्हटलं आहे. सोनिया गांधी यांनी केंद्रावर, संघीय शिक्षा व्यवस्थेला कमकुवत केल्याचा आरोप केला आहे. मोदी सरकार राज्य सरकारांना महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयाच्या बाहेर ठेऊन शिक्षणाचा संघीय पाया कमकुवत करत आहे अशी टीका सोनिया गांधी यांनी केली.

काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी या लेखात ८९ हजार शाळा बंद होण्याचा, भाजप-आरएसएसशी संबंधित लोकांची भरती असे मुद्दे उपस्थित केले. राष्ट्रीय शिक्षण धोरण हे भारतातील मुलं आणि युवकांच्या शिक्षणाप्रती उदासीन आहे. यात शिक्षण प्रणालीला जनसेवेच्या भावनेपासून वंचित ठेवण्यात आल्याचे म्हटलं आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेशी तडजोड करण्यात आली. भारतात शिक्षण व्यवस्थेची हत्या बंद झाली पाहिजे, असं म्हटलं आहे.

चर्चेविना एनईपी-२०२० लागू मागच्या ११ वर्षात अनियंत्रित केंद्रीकरण ही या सरकारच्या कार्यप्रणालीची खासियत राहिल्याची टीका सोनिया गांधी यांनी केली. २०१९ पासून केंद्रीय शिक्षण सल्लागार बोर्डाची बैठक झालेली नाही. या बैठकीत केंद्र आणि राज्याचे शिक्षण मंत्री सहभागी होतात. बोर्डाची अखेरची बैठक सप्टेंबर २०१९ मध्ये झाली होती. राज्य सरकारांशी चर्चा केल्याशिवाय 'एनईपी-२०२०' लागू करण्यात आल्याचा आरोप सोनिया गांधी यांनी केला.

# भेसळयुक्त आणि बनावट काळी डाळीचे सेवन केल्यावर शरीरावर काय परिणाम होतो? कशी ओळखाल भेसळ? तज्ञांनी दिली माहिती

अलीकडेच हिमाचल प्रदेशात कृत्रिम रसायनांनी रंगवलेली काळी डाळ (उडीद डाळ) आढळून आल्याची बातमी समोर आली, ज्यामुळे आरोग्याबाबत चिंता निर्माण झाली आहे. पत्रकार नेहा शर्मा यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला, ज्यामध्ये त्यांना राज्यातून मिळालेल्या काही बनावट काळ्या डाळीबाबत माहिती देण्यात आली आहे. व्हिडीओमध्ये बिया रात्रभर भिजवल्यानंतर त्यांचा काळा रंग गमावून हिरव्या रंगाच्या झाल्याचे दिसतात हे दाखवण्यात आले आहे. अशा भेसळयुक्त पदार्थांच्या सेवनामुळे शरीरावर काय दुष्परिणाम होतो हे समजून घेऊ सुरक्षित, चांगली डाळ कशी निवडावी हे समजून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसच्या होलिस्टिक हेल्थ अँड वेलनेस कोच ईशा लाल यांच्याशी संवाद साधला. बनावट किंव भेसळयुक्त डाळ खाल्ल्याने आरोग्याला कोणते धोके होतात? भेसळयुक्त अन्न, विशेषतः कृत्रिम रंगयुक्त पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम खालीलप्रमाणे :

१. यकृत आणि मूत्रपिंडांवर विषारी भार : कृत्रिम रंगांमध्ये बहुतेकदा शिसे किंवा आर्सेनिक यांसारखे जड धातू असतात. यकृत,हा मानवी शरीरातील प्राथमिक डिटॉक्स (विषारी पदार्थ बाहेर टाकणार) अवयव आहे. अशा विषारी पदार्थांना शरीराबाहेर काढण्यासाठी यकृताला जास्त वेळ काम करावे लागते, ज्यामुळे त्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. अभ्यासातून असे दिसून आले आहे की, अशा कृत्रिम रंगांचा वापर करून बनविलेल्या पदार्थांचे दीर्घकाळ सेवन केले, तर त्यातील विषारीपणामुळे यकृत आणि मूत्रपिंड बिघडण्याचा धोका ३०% पर्यंत वाढू शकतो

२. गॅस्ट्रोइंटेस्टाइनल त्रास :हे कृत्रिम रंग पोटाच्या अस्तरांना त्रास देऊ शकतात, ज्यामुळे मळमळ, पोटफुगी व अपचन होऊ शकते. आयुर्वेदिक तत्त्वांमध्ये यावर भर दिल्यानुसार, इष्टतम आरोग्यासाठी अग्नी (पाचनाची आग) संतुलित राहिला पाहिजे; परंतु बनावट रंग थेट हे संतुलन बिघडवतात.त्यासाठी अग्नि (पाचनाची आग) संतुलित राहिली पाहिजे. बनावट रंग थेट हे संतुलन बिघडवतात.



३. कर्करोगाचा धोका : काही कृत्रिम अन्नरंगांना कार्सिनोजेन्स म्हणून वर्गीकृत केले जाते. टार्ट्राझिनसारख्या अन्नात वापरल्या जाणाऱ्या रंगांच्या नियमित सेवनाविरुद्ध थक्ज कडून इशारा देण्यात आला आहे. कारण- त्यामुळे काही विशिष्ट कर्करोगांचा धोका वाढतो.

बनावट आणि खरी काळी डाळ कशी ओळखायची?

खरी आणि खरी काळी डाळ कशी ओळखायची? : पाण्यात भिजूवून करा चाचणी : एक ग्लास पाण्यात मूठभर डाळ २० मिनिटे भिजवा. जर पाणी गडद झाले किंवा तळाशी काही अवशेष राहिले, तर ते धोक्याचे आहे. प्रत्यक्षात खरी डाळ त्याचा रंग टिकवून ठेवते.

डाळ घासून करा चाचणी : डाळीचे काही दाणे घ्या आणि ते तुमच्या तळहातांवर घासून घ्या. जर रंग तुमच्या हाताला रंग लागला, तर ती डाळ कृत्रिम रंगांनी रंगवलेली असण्याची शक्यता आहे. वास घेऊन करा चाचणी : खऱ्या काळ्या डाळीला हलकासा मातीसारखा वास असतो. कृत्रिम रंग दिलेल्या डाळींना रसायनांचा वास येतो. विशेषत: डाळ धुतल्यानंतर हा वास तीव्रतेने जाणवतो. स्वरूप : नैसर्गिक डाळीचा पृष्ठभाग आणि रंग असमान असेल, तर रंगवलेली डाळ एकसारखी गडद आणि चमकदार दिसू शकते. हे डाळीमध्ये भेसळ केल्याचे लक्षण आहे. काळी डाळ तुमच्या नियमित आहाराचा भाग का असावी? काळी डाळ ही एक पौष्टिकतेने समृद्ध आहे, जी आयुर्वेद आणि आधुनिक पोषण दोन्हीमध्ये खूप योग्य पर्याय आहे. एक कप शिजवलेल्या काळ्या डाळीतून १४ ग्रॅम प्रथिने आणि १५ ग्रॅम फायबर मिळते, ज्यामुळे ती शाकाहारी आणि वनस्पतींशी आधारित आहार घेणाऱ्या लोकांसाठी एक प्रमुख पदार्थ बनते. ईशा लाल सांगतात, आयुर्वेदानुसार, काळी डाळ पोषण देते आणि पित्त थंड करून वात कमी करते. थंडीच्या महिन्यांत जेव्हा शरीराला उष्णता आणि पोषण हवे असते, तेव्हा ही डाळ खाणे विशेषतः फायदेशीर असते.

# चेहऱ्यावर सुरकुत्या दिसू लागल्या आहेत? मग त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी करा 'हे' घरगुती उपाय

वय वाढल्यानंतर त्वचेमध्ये अनेक बदल दिसू लागतात. या बदलांकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. अनेकदा त्वचेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महिला बाजारात उपलब्ध असलेल्या केमिकल प्रॉडक्टचा वापर करतात. मात्र हेच केमिकल प्रॉडक्ट त्वचेसाठी काहीवेळा घातक ठरतात. यामुळे पिंपल्स किंवा त्वचेवर मुरूम येण्याची शक्यता असते. त्वचेवर आलेले फोड किंवा मुरूम त्वचेचे पूर्णपणे नुकसान करतात. वाढत्या वयात महिलांच्या त्वचेमध्ये अनेक बदल दिसून येतात. चेहऱ्यावर आलेले वांग, पिंपल्स आणि काळे डाग त्वचेचे नुकसान करून टाकतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला वाढत्या वयात त्वचा दीर्घकाळ तरुण आणि उठावदार ठेवण्यासाठी काही घरगुती आणि सहज करता येतील असे उपाय सांगणार आहोत. हे उपाय केल्यास चेहऱ्यावर नैसर्गिक सौंदर्य कायम टिकून राहील.



रात्री झोपण्याआधी मेकअप काढावा:

सुंदर दिसण्यासाठी सर्वच महिला नेहमीच मेकअप करतात. मेकअप केल्यामुळे त्वचेवरील समस्या लगेच दिसून येत नाही. पण काहीवेळा मेकअप केल्यानंतर तो लवकर काढला जात नाही. त्वचेवर अधिककाळ मेकअप तसाच ठेवल्यामुळे त्वचेचे नुकसान होते. त्यामुळे रात्री झोपण्याआधी मेकअप व्यवस्थित काढून वरून कोणतेही तेल किंवा क्रीम लावावे. जास्त वेळ मेकअप त्वचेमध्ये राहिल्यामुळे ब्लॅकहेड्स, पिंपल्स इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात.

त्वचेची जास्त काळजी घ्यावी:


सर्वच महिलांनी त्वचेची योग्य ती काळजी घ्यावी. त्वचेची काळजी न घेतल्यामुळे त्वचेचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे नेहमी चेहऱ्याला सूट होणाऱ्या स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करावा. चेहऱ्यावर केमिकलयुक्त मास्क किंवा फेसपॅक लावण्याऐवजी घरगुती उपाय करून त्वचेची काळजी घ्यावी. त्वचेवर वृद्धत्वाची चिन्हे दिसू लागल्यास स्किन के अर रुटीनमध्ये बदल करावा. याशिवाय सूर्याच्या हानिकारक किरणांपासून त्वचेचे नुकसान होऊ नये म्हणून रोज सनस्क्रीन लावावे.

८ तासांची झोप: त्वचेचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी नियमित ८ तासांची झोप घेणे आवश्यक आहे. झोप घेतल्यामुळे शरीर आणि मन दोन्ही शांत राहते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात. झोपल्यामुळे त्वचेमधील हानिकारक पेशी बाहेर पडून जातात आणि त्वचा दुरुस्त होते. रोजच्या फ्रेश झोपमुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि काळी वर्तुळ निघून जातात. त्वचा मॉइश्चरायझ करणे: नियमित त्वचा मॉइश्चरायझ करणे आवश्यक आहे. चेहऱ्यावर मॉइश्चरायझ लावल्यामुळे त्वचेची गुणवत्ता सुधारून त्वचेतील ओलावा कायम टिकून राहतो. याशिवाय रोजच्या स्किन केअर रुटीनमध्ये तुम्ही रेटिनॉल आणि विटामिन सी सारखे अँटी-एजिंग घटक असलेले प्रॉडक्ट वापरू शकता.

# तुम्हीदेखील थायरॉईडची औषधे घेणे अचानक बंद करता का? त्याचा शरीरावर काय परिणाम होतो? तज्ज्ञांकडून जाणून घ्या..

जर तुम्हाला थायरॉईडचा त्रास असेल तर तुम्हाला चांगली औषधे घेण्याचा सल्ला दिला जाईल. जर तुम्हाला वाटत असेल की तुमच्या थायरॉईडच्या त्रासाची लक्षणे नियंत्रणात आहेत, तर गोळ्या खाणे अनावश्यक वाटू शकते, पण स्वतःहून गोळ्या खाणे बंद करण्याआधी त्याचा आरोग्यावर कसा परिणाम होतो हे जाणून घ्या. जेव्हा तुम्ही अचानक थायरॉईडची औषधे घेणे बंद करता, तेव्हा शरीरावर कसा परिणाम होतो याबाबत तज्ज्ञ काय सांगतात समजून घेऊ या.

बंगळुरू येथील एस्टर सीएमआय हॉस्पिटलचे एंडोक्राइनोलॉजी, सल्लागार डॉ. महेश डी एम यांनी द इंडियन एक्स्प्रेसला याबाबत माहिती दिली. जेव्हा एखादी व्यक्ती थायरॉईडची औषधे घेणे बंद करते तेव्हा शरीरात अनेक शारीरिक बदल होतात, जे एकूण आरोग्यावर लक्षणीय परिणाम करू शकतात. चयापचय, ऊर्जा पातळी आणि विविध शारीरिक कार्ये नियंत्रित करणारी थायरॉईड ग्रंथी पूरक औषधांशिवाय पुरेसे हॉर्मोन्स उत्पादन राखण्यासाठी संघर्ष करू शकते. परिणामी, थकवा, वजन वाढणे, नैराश्य आणि थंडीची संवेदनशीलता यांसारखी हायपोथायरॉईडीझमची लक्षणे पुन्हा दिसू शकतात किंवा आणखी बिघडू शकतात, असे डॉ. महेश डी एम यांनी सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की, शरीराच्या चयापचय प्रक्रिया मंदावू शकतात, ज्यामुळे ऊर्जेची पातळी कमी होऊ शकते आणि वजन वाढण्याची शक्यता असते, म्हणून रुग्णांनी त्यांच्या औषधोपचार पद्धतीत कोणताही बदल करण्यापूर्वी आरोग्यसेवा व्यावसायिकांशी सल्लामसलत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दुष्परिणाम काय आहेत? थायरॉईड औषधे बंद केल्याने तात्काळ आणि दीर्घकाळापर्यंत आरोग्य धोके निर्माण होऊ शकतात. थायरॉईड हॉर्मोन्सची पातळी नियंत्रित करण्यासाठी या औषधांवर अवलंबून असलेल्यांना केस गळणे, उर्जेच्या पातळीत चढउतार, मूडमध्ये अडथळा, मासिक पाळीत अडथळा आणि चयापचय असंतुलन यांसारखे अनेक प्रतिकूल परिणाम अनुभवता येतात. अल्पावधीत डॉ. महेश यांनी थकवा, वजन वाढणे आणि शरीर औषधांच्या अनुपस्थितीशी जुळवून घेत असताना संज्ञानात्मक अडचणी उद्भवू शकतात, अशी लक्षणे सूचीबद्ध केली. बंगळुरूतील बन्नेरघट्टा रोड येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या एंडोक्राइनोलॉजी-सल्लागार डॉ. अनुषा नादिग यांनी द इंडियन एक्स्प्रेसला याबाबत माहिती दिली. त्या सांगतात, थायरॉईडची औषधे बंद केल्याने दीर्घकालीन धोके उद्भवू शकतात, ज्यामध्ये हृदयरोग, ऑस्टियोपोरोसिस, वंध्यत्व, संज्ञानात्मक घट ( म्हणजे विचार करण्याच्या, शिकण्याच्या, लक्षात ठेवण्याच्या, निर्णय घेण्याच्या आणि निर्णय घेण्याच्या क्षमतेवर परिणाम होणे) आणि नैराश्याचा धोका वाढतो. उपचार न केलेले हायपोथायरॉईडीझम स्थिती गर्भपात, अकाली जन्म आणि गर्भधारणेदरम्यान जन्म दोषांचा धोका वाढवू शकते, असे त्या म्हणाल्या. तुम्ही थायरॉईडची औषधे किती वेळा घ्यावीत? सामान्यतः डॉ. महेश ही औषधे दिवसातून एकदा, शक्यतो सकाळी रिकाम्या पोटी घेण्याचा सल्ला देतात, जेणेकरून हार्मोन्सची पातळी स्थिर राहील. पण, विशिष्ट डोस आणि वारंवारता वैयक्तिक आरोग्याच्या गरजा, उपचार घेतलेल्या थायरॉईड विकाराचा प्रकार आणि रुग्णाच्या औषधांना मिळालेल्या प्रतिसादावर अवलंबून असू शकते. त्यांनी थायरॉईड फंक्शन चाचण्यांचे नियमितपणे निरीक्षण करणे आणि उपचारादरम्यान उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही संभाव्य दुष्परिणामांचे किंवा आरोग्य स्थितीत बदलांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे, यावर भर दिला.



# सर्दी, खोकला झाल्यावर गरमागरम हळदीचे दूध पिणे योग्य आहे का? काय म्हणतात तज्ज्ञ? घ्या जाणून

सर्दी, खोकला आणि काही हंगामी आजारांपासून आराम मिळविण्यासाठी आई, आजी 'हळदीचे दूध किंवा चिमूटभर मिरची पावडरसह हळदीचे दूध' पिण्याला प्राधान्य देतात. अजून चांगल्या फायद्यांसाठी ते सहसा गरमागरम पिण्याचासुद्धा सल्ला दिला जातो. पण, पोषण तज्ज्ञ गुरबाज सिंग यांनी अलीकडेच असा दावा केला आहे की, हळदीचे दूध नेहमी गरम न पिता खोलीच्या तापमानानुसार पिण्यास सांगितले आहे आणि असे न केल्यास आतड्यांवर परिणाम होतो, असा दावा केला आहे. या दाव्यात काही तथ्य आहे का? हळदीचे दूध कसे प्यावे हे समजून घेण्यापूर्वी पहिल्यांदा फायदे जाणून घेऊ फिसिको डाएट अँड ॲस्थेटिक क्लिनिकच्या संस्थापक आहारतज्ज्ञ विधी चावला म्हणाल्या की, हळदीतील कर्क्युमिन हा मध्यवर्ती घटक असतो. त्यामध्ये एक शक्तिशाली दाहकविरोधी गुणधर्म असतो, जो जळजळ कमी करण्यास मदत करतो आणि संधिवात, पचन समस्यांसह आजारांवर उपचार करण्यास मदत करू शकतो. त्याव्यतिरिक्त त्यात भरपूर अँटीऑक्सिडंट्स असतात, जे रोगप्रतिकार शक्ती वाढवतात आणि अनेक जुनाट आजार होण्याची शक्यता कमी करू शकतात. खोलीच्या तापमानानुसार हळदीचे दूध घ्यावे का? दूध जास्त गरम केल्याने त्यातील काही नैसर्गिक घटक, जसे की प्रथिने, जीवनसत्त्वे खराब होऊ शकतात. त्याशिवाय अत्यंत उच्च तापमानात कर्क्युमिनचा प्रभाव कमी होऊ शकतो. हळदीच्या गरम दुधात उष्णता स्थिर असली, तरी दूध जास्त वेळ गरम केल्याने दुधात थोडासा बिघाड होऊ शकतो, ज्यामुळे त्याचा उपचारात्मक प्रभाव कमी होतो. पोषक घटकांचा त्याग न करता, खोलीच्या तापमानात हळदीचे दूध कर्क्युमिनचे दाहकविरोधी आणि रोगप्रतिकार शक्ती वाढविणारे फायदे प्रदान करते, असे विधी चावला म्हणाल्या.

याव्यतिरिक्त हळदीचे गरम दूध प्यायल्याने तुमची जीभ किंवा घसा जळण्याचा धोका न घेता, घशाला आराम देते.

हळदीचे दूध हे एक आरोग्यदायी पेय असू शकते. पण, खोलीच्या तापमानावर ठेवल्यास किंवा हळूहळू किंवा कमी गरम केल्यास त्याचे अधिक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. या



असतो, जे अस्वस्थ, त्रासदायक ठरू शकते. विशेषतः संवेदनशील पोट असलेल्या लोकांसाठी, असे विधी चावला म्हणाल्या आहेत. साधारणपणे खोलीच्या तापमानात हळदीच्या दुधाची उबदारता चांगली असते. कारण- यामुळे घशातील खवखव कमी करते आणि जास्त गरम होण्याचा किंवा पोषक घटक गमावण्याचा धोका पद्धतीमुळे तुम्ही दुधातील खनिजे टिकवून ठेवत हळदीच्या फायद्यांचा पूर्ण फायदा घेऊ शकता. निरोगी, अधिक फायदेशीर हळदीच्या दुधासाठी पुढच्या वेळी ते बनविताना जास्त उष्णता वगळण्याचा विचार करा, असे विधी चावला म्हणाल्या.

# अर्धमसला येथे खा.बजरंग सोनवणे यांची भेट; शांतता, सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन

## हिंदू-मुस्लिम बांधवांशी साधला संवाद


केज/प्रतिनिधी अर्धमसला (ता.गेवराई ) येथील मस्जिदमधे दि.३० मार्च रोजी पहाटे जिलेटीनचा स्फोट झाला. यानंतर पोलीस प्रशासनाने तातडीने दोन आरोपीना ताब्यात घेतले. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे यांनी अर्धमसला येथे भेट देत मस्जिदची पाहणी केली. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधत शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन केले. अर्धमसला गावात ईदच्या आदल्या दिवशी दोघांनी मिळून पवित्र मस्जिदमधे जिलेटिन कांड्याचा स्फोट केला. स्फोटात मस्जिदला तडे गेले आहेत. दरम्यान, ही घटना समजताच खा.बजरंग सोनवणे यांनी अंबाजोगाई तालुक्यातील नियोजित कार्यक्रम बाजूला सारून अर्धमसला गावात जाऊन मस्जिदची पाहणी करून हिंदू-मुस्लिम बांधवांशी संवाद साधला. यावेळी गावातील लोक प्रचंड समजदार आहेत, याठिकाणी दोन्ही धर्मातील लोकांमधे एकमेकांच्या मनात प्रचंड आदर दिसत आहे.



जे कोणी आरोपी आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी आपण पोलिस अधीक्षक यांना बोलनार आहोत. हिंदू-मुस्लिम बांधवांचे मोठे सण साजरे केले जात आहेत. हा उत्सव आनंदात साजरा करावा आणि सलोखा कायम ठेवावा, असे आवाहन केले. यावेळी मुस्लिम बांधवानी देखील गावात आम्ही कायम एकीने राहत आलो आहोत, आजही आणि उद्याही एकीने राहू, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, दत्तात्रय ठोंबरे, निझाम शेख, बाबुराव पोटभरे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याशी गावात चर्चा करून या स्फोटामागे काय उद्देश होता हे तपासा, अश्या सूचना केल्या. 'त्याच' मस्जिदमधे खा.सोनवनेंचा इफ्तार अर्धमसला गावात ज्या मस्जिदमधे स्फोट झाला, त्याच ठिकाणी खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत हिंदू-मुस्लिम बांधवानी एकत्रीत येत इफ्तार केला. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, बाबुराव पोटभरे,निजाम शेख, भागवत तावरे यांची उपस्थिती होती.

# निलंगा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती कार्यकारिणी जाहीर..

निलंगा :- विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव म्हणजे सामाजिक परिवर्तनाचा आणि समतेचा विचार डोळ्यासमोर उभा राहतो. बाबासाहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात अन्यायाविरुद्ध संघर्ष केला आणि वंचित, शोषित, पिडितांना त्यांचा न्याय हक्क व अधिकार मिळवून दिला. त्यांचे विचार पुस्तकातच बंदिस्त न राहता समाजातील प्रत्येक घटकात पोहोचला पाहिजे ही काळाची गरज आहे. या उद्देशाने दि.२९ रोजी येथील शासकीय विश्रामगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती गठीत करण्यात आली.यात सर्वानुमते अध्यक्षपदी धम्मानंद काळे तर कार्याध्यक्षपदी आयु. रामलिंग पटसाळगे यांची निवड करण्यात आली. या समिती उपाध्यक्षपदी आयु. दिगंबर सूर्यवंशी,आयु. वाल्मीक चव्हाण आयु. देवदत्त सूर्यवंशी, आयु. संदीप बनसोडे,कोषाध्यक्षपदी आयु. संजय सोनकांबळे,सह कोषाध्यक्ष आयु. निलेश गायकवाड सचिवपदी आयु. गोविंद सूर्यवंशी सह सचिव आयु. अमोल सोनकांबळे प्रसिद्धीप्रमुख पदी मिलिंद कांबळे, सोशल मीडिया प्रमुखपदी आयु. दयानंद कांबळे,सल्लागार आयु. प्रकाश गायकवाड संघटक पदी दत्ताभाऊ सूर्यवंशी चिचोंडिकर कायदेविषयक सल्लागार ड.सुशील सोमवंशी इत्यादींची सर्वानुमते निवड करण्यात आली. या समितीत आयु.उध्दव मेकाले, राजू कांबळे, दीपक चोपणे, मुजीब सौदागर, दत्ता शिंदे, सुमित गायकवाड, करण कांबळे, आश्विन सूर्यवंशी, आशिष पराग, आशिष सोनकांबळे, समर्थ देशमुख, श्रीनिवास शिंदे , प्रवीण कांबळे, सचिन सुरवसे, बालाजी कांबळे, विजय पाटील, उत्तम माने, विश्वनाथ शिंदे, विरेंद्र काळे,राहुल मोरे,सुधीर पटसाळगे,दत्ता सूर्यवंशी माळेगावकर, अतिश काळे,इत्यादींचा सक्रिय सहभाग आहे.



# केज तालुक्यातील वरपगाव येथील हर्षवर्धन,रेशमा, रिचा यांनी एमबीबीएस अंतिम वर्ष परीक्षेत मिळवले घवघवीत यश

**वरपगाव तालुका केज च्या नावलौकिकात घातली मोलाची भर**

केज/प्रतिनिधी संत श्री नागेशपुरी महाराज,संत श्री रामकृष्ण महाराज यांच्या पद स्पर्शाने पावन झालेली वरपगावची भूमी आहे. पूर्वीपासूनच पंचक्रोशीमध्ये गावातील युवकांनी आपल्या बौद्धिक क्षमता विविध क्षेत्रांमध्ये दाखवलेली आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये राज्याचे प्रतिनिधित्व असो, वकील क्षेत्रामध्ये गल्लीपासून दिल्ली पर्यंत गावातील कार्यरत विधीज्ञ असो, तसेच शहरी भागातून संस्थेचे जाळे निर्माण करणारे युवक, व्यवसायामध्ये गरुड भरारी घेणारे व्यावसायिक, नोकरीमध्ये आपली वेगळी छाप सोडणारे नोकरदार असोत,सामाजिक क्षेत्रात काम करणारे समाजसेवक असोत असे विविध क्षेत्रांमध्ये अनेक जणांनी आपला वेगळा ठसा निर्माण केलेला आहे.

आज लागलेल्या एमबीबीएस अंतिम वर्षे परीक्षेच्या निकालात गावातीलच चि हर्षवर्धन प्रवीण देशमुख,कु. रिचा बालासाहेब देशमुख,कु. रेश्मा संतोष देशमुख यांनी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण होऊन मोठे यश संपादन केले आहे. वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे हे तीनही विद्यार्थी यांनी विविध ठिकाणच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेतलेले आहे.

हर्षवर्धन चे वडील जय भवानी कन्या प्रशाला चे मुख्याध्यापक असून रेशमाचे वडील कृषी



सेवा केंद्राचे मालक आहेत तसेच रिचा चे वडील स्टेशनरी व्यवसायात आहेत. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या या पालकांच्या पाल्यांनी उल्लेखनीय संपादन केले आहे.

वरील मुलांनी यश मिळवल्यानंतर ग्रामपंचायत वरपगाव गावच्या वतीने उपसरपंच ड. बाबुराव देशमुख तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, सर्व गावकरी यांच्यावतीने विद्यार्थी व पालकांचे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच पुढील कार्याला शुभेच्छा देण्यात आल्या त्यांनी आपल्या आयुष्यात गोरगरीब जनतेची सेवा करावी अशी अपेक्षा गावातील जाणकार व्यक्तींनी व्यक्त केली.

# केज पोलिसांकडून अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा पार्किंगला मुक्त मुभा अवैद्य धंदे व अतिक्रमणाच्या विळाख्यात केजची तहसील झाकाळली

केज/प्रतिनिधी केज पोलिसांकडून अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांना केज पोलीसांनी मुक्त मुभा दिली आहे का? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. अवैद्य धंदे व अतिक्रमणाच्या विळाख्यात केजची तहसील झाकाळली असल्याचे दिसून येते तशी चर्चा जनसामान्यातून नागरीकातुन ऐकण्यास मिळत आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसर व प्रवेशद्वार या ठिकाणी अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा पार्किंगला केज पोलीस कडून मुक्त मुभा दिली असल्याचे दिसून येते व अवैद्य धंदे आणि अतिक्रमणाच्या विळाख्यात केजची तहसील झाकाळली अशी चर्चा नागरिकांतून ऐकण्यास येत आहे. ग्रामीण भागातील वयोवृद्ध, महिला, युवक-युवती नागरिक हे कामानिमित्त तहसील कार्यालय ,पंचायत समिती कार्यालय ,येथे येतात परंतु अवैध प्रवासी वाहतूक करणारे,रिक्षा पार्किंग मुळे व अतिक्रमणामुळे तहसील कार्यालय नेमके कुठे आहे ते दिसून येत नाही .त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची तारांबळ उडत असल्याचे चित्र आहे. तहसील कार्यालयाच्या गेट समोरील रिक्षा पार्किंग आणि अतिक्रमण मुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसरात मेन रोडवर वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत असताना हाकेच्या अंतरावर असलेल्या केज पोलिस यावर काहिच बोलत नाहीत, अवैद्य प्रवासी वाहतूक करणारे इतके निर्ढावलेले आहेत, चक्क रस्त्यावर रिक्षा उभे करून रिक्षावाले अवैद्य प्रवासी वाहतूक



करत आहेत परंतु सदर वाहतुकीकडे केज पोलिसाचा कानाडोळा का? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. तहसील कार्यालयात कामानिमित्त येणारे नागरिक व शहरातील नागरिक व विद्यार्थी रस्त्याने येजा करत असताना त्यांना नाहक त्रास होत आहे. अवैद्य प्रवासी वाहतूक करणारे रिक्षा व जीप आणि अवैद्य धंदे हे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसरात सर्रासपणे चालू असताना देखील केज तहसीलचे तहसीलदार ऊघडपणे पाहत आहेत. तहसील कार्यालयाच्या समोर उपोषण स्थळ आहे या उपोषण स्थळाच्या ठिकाणी रिक्षा पार्किंग आहे एखाद्या व्यक्तीला उपोषणाला बसायचे झाले तर या ठिकाणी उपोषणाला बसता देखील येत नाही रिक्षावाले उपोषणकर्त्याला त्या ठिकाणी बसू देत नाहीत व तहसील कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकास या ठिकाणी थांबू दिले जात नाही तर वरून त्यांना म्हणतात आम्ही पोलीस स्टेशनला हप्ते देत आहोत असे जनसामान्यातून बोलले जात आहे. सध्या केज शहरांमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरूड पुतळा काही दिवसापूर्वी बसवण्यात आला आहे या पुतळ्याच्या व चौकाच्या सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर चालू आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूड पुतळ्यामुळे शहराच्या वैभववात भर पडली आहे परंतु अवैद्य प्रवासी वाहतुकीमुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसरामध्ये अडथळा निर्माण होत आहे या ठिकाणी अपघाता सारख्या दुर्घटना घडण्याची शक्यता नाकरता येत नाही. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात अवैद्य प्रवासी वाहतूक करणारे रिक्षाची पार्किंग व अवैद्य धंदे मुळे मोठ्या वाहनांना वळण घेता येत नाही त्यामुळे अनेक वेळा या ठिकाणी छोटे-मोठे अपघाताच्या घटना घडल्या आहेत व छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या वाहनांना वळण रस्ता घेता येत नाही. रहदारीस अडचण निर्माण होत आहे व या ठिकाणी वाहतूक काही काळ ठप्प होत आहे. मोठ्या वाहनांच्या वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे व या ठिकाणी वाहतुकीस अडचण निर्माण होत आहे. काही वेळा तर मोठी वाहने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकाला घासून जात आहे त्यामुळे चौकाची देखील नुकसान होत आहे त्यामुळे शिवप्रेमी नाराज आहेत या प्रकरणी शिवप्रेमी मोठे आंदोलन करणार आहेत अशी चर्चा ऐकण्यास येत आहे.

# बुधोडा येथे आज चौथी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद माजी सभापती बालाजी कांबळे यांची माहिती

लातूर: वैशाली चॅरिटेबल ट्रस्ट आणि बुधोडा ग्रामस्थांच्या वतीने १ एप्रिल रोजी बुधोडा येथे बुद्ध मूर्ती स्थापना आणि चौथी अखिल भारतीय चौथी बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती तथा धम्म परिषदेचे स्वागताध्यक्ष बालाजी कांबळे यांनी दिली.

यावेळी भंते उपगुप्त महाथेरो, भंते पय्यानंद थेरो, भंते बुद्धशील यांच्यासह भिक्खू संघाची धम्मदेशना होणार असून बुद्धमूर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी आमदार अभिमन्यू पवार तर उद्घाटक म्हणून एमएस आरडीसीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, पालकमंत्री बाबासाहेब पाटील, खा. ओमराजे निंबाळकर, आ. अमित देशमुख, आ. संजय बनसोडे,आ. रमेशआप्पा कराड, माजी खा. सुनील गायकवाड, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीनारायण लाहोटी, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, भाजप युवा नेते विश्वजीत गायकवाड, रिपाई नेते चंद्रकांत चिकटे, शिक्षक नेते कालिदास माने आदी उपस्थित राहणार आहेत.

भोजन दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत असणार आहे. सायंकाळी ६ वाजता नागपूर येथील सिनेअभिनेत्री, गायिका अंजली भारती (भीमाची वाघीण) यांचा तुफान शाहीरी जलसा होणार आहे. पंचक्रोशीतील जनतेने याचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष बालाजी कांबळे यांनी केले आहे.

# १ एप्रिलपासून देशात लागू होणार 'हे' १० मोठे बदल! जाणून घ्या सविस्तर

आज मार्च महिन्याचा शेवटचा दिवस, उद्यापासून म्हणजेच १ एप्रिल २०२५ पासून नवीन कर वर्ष सुरू होत आहे. दर महिन्याप्रमाणे, महिन्याच्या पहिल्या दिवसापासून देशात अनेक मोठे बदलदेखील लागू केले जातील, ज्याची झळ प्रत्येक कुटुंबाला आणि प्रत्येक सर्वसामान्याच्या खिशाला बसू शकते. हे बदल एलपीजी सिलिंडर, तुमचे बँक खाते, डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्डच्या किमतींमध्ये दिसून येतील. इतकेच नाही तर महामार्गावरून प्रवास करणे महाग होऊ शकते, कारण अनेक मार्गांवर टोल कर वाढणार आहे. अशा १० मोठ्या बदलांबद्दल सविस्तर जाणून घेऊया...

एलपीजीच्या किमती वाढ होणार!

दर महिन्याच्या पहिल्या दिवशी, तेल आणि गॅस वितरण कंपन्या एलपीजी सिलिंडरच्या सुधारित किमती जारी करतात आणि १ एप्रिल २०२५ रोजीदेखील त्यामध्ये बदल दिसून येतील. अलिकडच्या काळात १९ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ-कमी झाली असली तरी, एलपीजी सिलिंडरची किंमत बऱ्याच काळापासून तशीच आहे. अशा परिस्थितीत, नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीसह, लोकांना १४ किलोच्या सिलिंडरच्या किमतीत दिलासादायक बदल अपेक्षित आहे.


सीएनजी-पीएनजी आणि एटीएफच्या किमती

एलपीजी सिलिंडरच्या किमतींव्यतिरिक्त, सीएनजी आणि पीएनजीच्या किमतींमध्येही पहिल्या तारखेपासून सुधारणा होऊ शकते. त्याचवेळी, कंपन्या १ एप्रिल २०२५ रोजी एअर टर्बाइन इंधन म्हणजेच एटीएफच्या किमतीतही बदल करू शकतात. सीएनजीच्या किमतीतील चढ-उतारामुळे तुमच्या वाहनाच्या खर्चात वाढ होईल किंवा त्यात दिलासा मिळेल, परंतु एटीएफच्या किमतीत वाढ झाल्याने विमान प्रवास महाग होऊ शकतो.

हे आयडी बंद होणार १ एप्रिल २०२५ पासून होणारा पुढील बदल युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस म्हणजेच शी संबंधित आहे. बऱ्याच काळापासून सक्रिय नसलेल्या मोबाईल नंबरशी जोडलेली खाती बँक रेकॉर्डमधून काढून टाकली जातील. जर तुमचा फोन नंबर पशी लिंक असेल आणि तुम्ही तो बराच काळ वापरला नसेल, तर त्याच्या सेवा बंद केल्या जाऊ शकतात.

डेबिट कार्डसाठी नवीन नियम

१ एप्रिल २०२५ पासून लागू होणाऱ्या रुपे डेबिट सिलेक्ट कार्डमध्ये काही मोठे अपडेट केले जाणार आहेत. यामध्ये फिटनेस, वेलनेस, प्रवास आणि मनोरंजन यांचा समावेश होणार आहे. अपडेट्सबद्दल बोलायचे झाले तर, निवडक लाउंजमध्ये दर तिमाहीत एकदा मोफत देशांतर्गत लाउंज प्रवेश आणि वर्षातून दोन आंतरराष्ट्रीय लाउंज प्रवेश मिळणार आहेत. याशिवाय, अपघातात मृत्यू किंवा कायमचे दिव्यांगत्व आल्यास १० लाख रुपयांपर्यंतचे वैयक्तिक अपघात विमा संरक्षण उपलब्ध असेल. दर तिमाहीत मोफत जिम सदस्यत्व सुविधा असेल.




युनिफाइड पेन्शन स्कीम

नवीन कर वर्षाच्या सुरुवातीसह, केंद्रीय कर्मचाऱ्यांना हमी पेन्शन देणारी युनिफाइड पेन्शन स्कीम १ एप्रिलपासून सुरू होणार आहे. केंद्र सरकारी कर्मचारी १ एप्रिलपासून पोर्टलवर अर्ज करू शकतील. जर कर्मचाऱ्याला अंतर्गत पेन्शन मिळवायचे असेल, तर त्याला पर्याय निवडण्यासाठी क्लेम फॉर्म भरावा लागेल. जर त्यांना ची निवड करायची नसेल तर ते ची निवड करू शकतात. याअंतर्गत, २३ लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना यूपीएस आणि एनपीएस यापैकी एक पर्याय निवडावा लागेल. यूपीएस पर्याय निवडणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना केंद्र सरकार (मूलभूत वेतन + महागाई भत्ता) च्या अंदाजे ८.५% अतिरिक्त योगदान देखील देईल. यूपीएस अंतर्गत किमान पेन्शन दरमहा १० हजार रुपये असेल, जे यूपीएसने किमान दहा वर्षे सेवा पूर्ण केल्यावर दिले जाईल.

कर स्लॅबशी संबंधित नियम

२०२५ च्या अर्थसंकल्पात, सरकारने मध्यमवर्गाला दिलासा देण्यासाठी अनेक मोठ्या घोषणा केल्या, ज्यामध्ये कर स्लॅबमध्ये बदल, टीडीएस, कर सवलत आणि इतर गोष्टींचा समावेश होता. जुन्या आयकर कायदा १९६१ च्या जागी नवीन आयकर विधेयक प्रस्तावित करण्यात आले. हे सर्व बदल १ एप्रिल २०२५ पासून लागू होतील. नवीन कर स्लॅब अंतर्गत, वार्षिक १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या व्यक्तींना कर भरण्यापासून सूट दिली जाईल. याशिवाय, पगारदार कर्मचारी ७५,००० रुपयांच्या मानक वजावटीसाठी पात्र असतील. याचा अर्थ, १२.७५ लाख रुपयांपर्यंतचे पगाराचे उत्पन्न आता करमुक्त होऊ शकते. तथापि, ही सूट फक्त नवीन कर पर्याय निवडणाऱ्यांनाच लागू होते.

टीडीएस मर्यादेत वाढ

टीडीएस नियमदेखील अद्ययावत करण्यात आले आहेत, ज्यामध्ये अनावश्यक कपात कमी करण्यासाठी आणि करदात्यांसाठी रोख प्रवाह सुधारण्यासाठी विविध विभागांमध्ये मर्यादा वाढविण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ, ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याज उत्पन्नावरील टीडीएस मर्यादा दुप्पट करून १ लाख रुपये करण्यात आली आहे, ज्यामुळे वृद्धांसाठी आर्थिक सुरक्षितता वाढली आहे. त्याचप्रमाणे, भाडे उत्पन्नावरील सूट मर्यादा वार्षिक ६ लाख रुपये करण्यात आली आहे, ज्यामुळे घरमालकांवरील भार कमी होईल आणि शहरी भागात भाडे बाजाराला चालना मिळू शकेल.

क्रेडिट कार्डशी संबंधित नियम

१ एप्रिल २०२५ पासून क्रेडिट कार्डच्या नियमांमध्ये बदल होतील, ज्यामुळे त्यांच्यावर उपलब्ध असलेल्या बक्षिसे आणि इतर सुविधांवर परिणाम होईल. तर त्यांच्या क्रेडिट कार्डवरील रिवॉर्ड्स ५ पटीने कमी करून निम्मे करेल. त्यामुळे एअर इंडियाचे सिग्नेचर पॉइंट्स ३० वरून १० पर्यंत कमी केले जातील. याशिवाय, आयडीएफसी फर्स्ट बँक क्लब विस्तारा माइलस्टोनचे फायदे बंद करणार आहे.

बँक खात्याशी संबंधित बदल

१ एप्रिलपासून, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि पंजाब नॅशनल बँक सह अनेक बँका ग्राहकांच्या बचत खात्यांमध्ये किमान शिल्लक रकमेशी संबंधित नियमांमध्ये सुधारणा करतील. खातेधारकाच्या किमान शिल्लक रकमेसाठी बँक क्षेत्रनिहाय नवीन मर्यादा निश्चित करेल आणि खात्यात किमान शिल्लक रक्कम न ठेवल्यास दंड आकारला जाऊ शकतो.

टोल टॅक्समध्ये वाढ

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आज मध्यरात्रीपासून म्हणजेच ३१ मार्चपासून टोल कर दर वाढवू शकते, ज्याचा थेट परिणाम तुमच्या महामार्ग प्रवासावर होऊ शकतो. जर या वृत्तांवर विश्वास ठेवला तर, ने १ एप्रिलपासून विविध टोल प्लाझावर वाढीव दर लागू करण्याचा आदेश जारी केला आहे. त्यानुसार, लखनौमधून जाणाऱ्या महामार्गावरील हलक्या वाहनांसाठी टोलमध्ये ५ रुपयांची वाढ होऊ शकते. जड वाहनांसाठी ही वाढ २० ते २५ रुपयांपर्यंत असू शकते. लखनौ-कानपूर, अयोध्या, रायबरेली आणि बाराबंकी सारख्या वर्दळीच्या महामार्गांवर असलेल्या अनेक टोल प्लाझावर हे नवीन दर लागू केले जाऊ शकतात. याशिवाय, दिल्ली-मेरठ एक्सप्रेसवे, ईस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेसवे आणि एनएच-९ वरून जाणाऱ्या प्रवाशांना टोल टॅक्स म्हणून जास्त पैसे द्यावे लागू शकतात.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE